# टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या 'जाणा आपला आयुर्वेद' प्रदर्शन सर्वांसाठी खुले.

टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या ९० व्या वर्धापनदिनानिमित्त 'जाणा आपला आयुर्वेद' हे आयुर्वेदाची सर्वांगाने ओळख करुन देणारे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या निमित्त आयोजित उदघाटन कार्यक्रमात डॉ.प्रदीपकुमार प्रजापती - कुलगुरु, डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन आयुर्वेद विद्यापीठ, जोधपूर यांच्या हस्ते शुक्रवार दि.२३.०६.२०२३ रोजी आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले.

महाविद्यालयाच्या संशोधनात्मक व सर्वांगिण प्रगतीचा लेखा-जोखा घेताना महाविद्यालयाने केलेल्या अभूतपूर्व प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करताना 'टिळक आयुर्वेद महाविद्यालय हे इंटिग्रेशनचा पुरस्कर्ता असल्याचे' सांगितले. महाविद्यालयातील १४ विभागांनी जनतेला आयुर्वेदची ओळख करुन देण्याबाबत हे प्रदर्शन परिपूर्ण आहे व अशा प्रदर्शनांनी समाजाची आयुर्वेदाप्रती ओढ अधिक वाढेल असाही विश्वासडॉ.प्रजापती यांनी व्यक्त केला.

प्रदर्शनाची माहिती व कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करीत असताना प्राचार्य डॉ.सदानंद देशपांडे यांनी 'आयुर्वेद प्रेमी व जनमानसाने याचा लाभ घेण्याचे आवाहन' केले. सदर प्रदर्शन दि.२३ ते २६ जून २०२३ या कालावधीत सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत असल्याचे कळविले आहे.

उद्घाटनाच्या कार्यक्रमात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात प्रथम येणाऱ्या व विविध विषयात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना डॉ.किरुमक्की सुवर्ण पदक देवून गौरविण्यात आले. राष्ट्रीय शिक्षण मंडळ या मातृसंस्थेतर्फे दिला जाणारा 'उत्कृष्ट शिक्षक' पुरस्कार प्राध्यापक डॉ.विनया दीक्षित यांना तर 'उत्कृष्ट विभागाचा' पुरस्कार स्वस्थवृत्त विभागाचे विभाग प्रमुख डॉ.मिहीर हजरनवीस यांनी स्वीकारला. 'कार्यकुशल कार्यालयीन कर्मचारी' म्हणून श्री.ओंकार नारकर तर 'कर्तव्यतत्पर सेवक' होण्याचा मान श्री.आनंदा हुंबरे यांनी पटकाविला. डॉ.मंजिरी देशपांडे यांनी डॉ.किरुमक्की पारितोषिकांबद्दल तर डॉ.सरोज पाटील यांनी राष्ट्रीय शिक्षण मंडळ पुरस्कृत पारितोषिकांबद्दल विद्यार्थीभिमुख मातृसंस्थेची भूमिका विषद केली.

रोगनिदान विभागाने 'आयुर्वेदाद्वारे आजारामध्ये घ्यावयाची काळजी' व कायचिकित्सा विभागाद्वारे महत्त्वाच्या पाच विविध आजारांवर काढलेल्या पुस्तकांचे विमोचन कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.दिलीप पुराणिक व डॉ.प्रदीपकुमार प्रजापती यांच्या हस्ते करण्यात आले. नेटक्या पध्द्तीने या प्रदर्शनाद्वारे आयुर्वेदाची ओळख करुन दिल्याबद्दल अध्यक्ष डॉ.दिलीप पुराणिक यांनी सर्व अध्यापक व विद्यार्थी यांचे अभिनंदन केले.

डॉ.इंदिरा उजागरे यांनी मान्यवरांची ओळख करुन दिली. डॉ.नंदकिशोर बोरसे यांनी आभार प्रदर्शन केले. डॉ.मिहीर हजरनवीस यांचे नेटक्या शब्दात केलेले सूत्रसंचालन प्रेक्षकांना विशेष भावले.

****